DAY — 21 SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	10	1100	J-433	(M)

DEFENCE STUDIES (77)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) कृतिपत्रिकेत संकल्पना चित्र / तक्ते पेन्सिल किंवा पेनाने काढावेत तसेच ते चित्र / तक्ते यातील शब्द पेनानेच लिहावेत.

(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

प्र. १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (५) **[२०]**

(१) युगोस्लाव्हियाची राजधानी -------- येथे १९६१ मध्ये अलिप्ततावादी राष्ट्रांची पहिली परिषद झाली.

(अ) पॅरिस (ब) बेलग्रेड

(क) टोकियो

(२) सियाचिन ही -------- पर्वतराजीतील सर्वात मोठी हिमनदी आहे.

(अ) सह्याद्री (ब) सातपुडा

(क) काराकोरम

(३) भारताने मुंबईतील तुर्भे येथे १९५६ मध्ये -------- ही प्रथम अणुभट्टी उभारली.

(अ) अप्सरा (ब) झर्लिना

(क) सीरस

(४) उल्फा या दहशतवादी संघटनेने ------- पासूनच बांगलादेश आणी म्यानमार मध्ये प्रशिक्षण तळ उभारले होते.

(अ) १९८५ (ब) १९९०

(क) १९९९

(५) भारतातील साधारण ------- जिल्हे नक्षलवादी हिंसेने बाधित आहेत असे मानले जाते.

(अ) १५० (ब) १७०

(क) १६०

(ब) योग्य जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) इंडोनेशिया	(१) दलाई लामा
(ब) तिबेटी धर्मगुरू	(२) बांडुंग
(क) पहिला स्वदेशी उपग्रह	(३) १८ सप्टेंबर २०१६
(ड) उरी लष्करी तळावर हल्ला	(४) पीपल्स लिबरेशन आर्मी
(इ) चीन	(५) आर्यभट्ट

(क) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना दिलेल्या पर्यायांतून निवडा : (५)

(१) १६ डिसेंबर १९७१ रोजी निर्मिती झालेला देश –

(अ) म्यानमार (ब) नेपाळ

(क) बांगलादेश

(२) भारत बांगलादेश दरम्यान वादात असलेले व सध्या पाण्याखाली असलेले बेट –

(अ) न्यू-मूर (ब) लक्षद्वीप

(क) अंदमान निकोबार

(३) कॅनडा, भारत आणि अमेरिकेल्या संयुक्त मोहिमेतून उभारण्यात आलेली अणुभट्टी –

(अ) सीरस (ब) अप्सरा

(क) झर्लिना

(४) गनिमी काव्याच्या युद्धाप्रमाणे भासत असल्या तरी विशिष्ट भूप्रदेशावर नियंत्रण मिळविण्याच्या हेतू पुरत्या ज्या दहशतवादी कारवाया मर्यादित नसतात त्यास असे म्हणतात –

(अ) समान युद्ध (ब) असमान युद्ध

(क) संतुलित युद्ध

(५) चीनने अधिग्रहीत / अतिक्रमण केलेला भारताच्या भूभाग –

(अ) तिबेट (ब) पाकव्याप्त काश्मीर

(क) अक्साई चीन

(ड) खालील गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा : (५)

(१) भारताचे प्रधानमंत्री –

(अ) अटल बिहारी वाजपेयी (ब) इंदिरा गांधी

(क) राजीव गांधी (ड) नवाज़ शरीफ

(२) पूर्व आशियाई देश –

(अ) इंडोनेशिया (ब) श्रीलंका

(क) मलेशिया (ड) थायलंड

(३) सर्जिकल स्ट्राईक (लक्ष्यभेदी हल्ला) –

(अ) जनतेची हानी (ब) गुप्तचर संघटना

(क) लष्कर (ड) शासन

(४) भारतीय क्षेपणास्त्र –

(अ) पृथ्वी (ब) अग्नी

(क) रोहिणी (ड) त्रिशूल

(५) १९६२ चे भारत–चीन युद्ध –

(अ) २० ऑक्टोबर १९६२ (ब) ड्युरंड रेषा

(क) अरुणाचल प्रदेश (ड) लडाख

प्र. २. **(अ)** दिलेल्या पर्यायांतून पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा : (६) **[१०]**

(१)



(२)



(काशगर, सुवेझ कालवा, इस्लामाबाद, ६ अंश चॅनेल, ग्वादर, मलाक्का सामुद्रधुनी)

(ब) खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : (४)



(१) मॅकमहॉन रेषा भारताच्या कोणत्या घटक राज्याला संलग्न आहे?

(२) नकाशात दाखविलेली नदी कोणती?

(३) नकाशातील अतिपूर्वेकडील खिंडीचे नाव काय आहे?

(४) नकाशात दाखविलेल्या खोऱ्याचे नाव लिहा.

प्र. ३. पुढील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही पाच): **[१०]**

(१) देशाची आर्थिक स्थिती मजबूत असेल तर सुरक्षेवर त्याचा परिणाम होत नाही.

(२) १९५६ मध्ये चीन-पाक दरम्यान मैत्री करार झाला.

(३) १९९६ मध्ये भारत बांगलादेश दरम्यान गंगा पाणी वाटप करार करण्यात आला.

(४) ऑगस्ट २०१९ मध्ये भारतीय संविधानातील कलम ३७० अंतर्गत जम्मू-काश्मीरला देण्यात आलेला विशेष दर्जा रद्द करण्यात आला.

(५) अमेरिका आणि कॅनडाने भारताच्या पहिल्या अणुचाचणीचे स्वागत केले होते.

(६) 'ऑपरेशन पोलो' ही लष्करी कारवाई भारताने जम्मू-काश्मीर येथे केली होती.

(७) भूतानचे परराष्ट्र धोरण भारताच्या मार्गदर्शनानुसार आज ही चालते.

(८) १९४९ मध्ये भारताने आय एन एस विक्रांत ही पहिली विमानवाहू युद्ध नौका खरेदी केली.

(९) माओवादी संघटनांच्या कारवाया देशातील प्रामुख्याने शहरी भागात सुरू आहे.

प्र. ४. खालील तक्ता पूर्ण करा (कोणताही एक गट) : **[६]**

(१) **गट 'अ'**

देश	**दहशतवादी हल्ल्याचे ठिकाण**	**वर्ष**
अमेरिका	वर्ल्ड-ट्रेड सेंटर	----------
इंडोनेशिया	----------	२००५
----------	पॅरिस	२०१५

(२)

पर्व	वर्ष	वैशिष्ट्ये
चौथे पर्व	---------	कारगिल युद्ध
---------	१९४७-१९६२	अलिप्ततावादी गटाची स्थापना
दुसरे पर्व	१९६२-१९७१	---------

(चीनची अणुचाचणी, बाली बेट, १९९१ ते आजपर्यंत, २००१, पहिले पर्व, फ्रान्स)

(१) **गट 'ब'**

वर्ष	दहशतवादी हल्ले	शहर
----------	संसद भवन	नवी दिल्ली
२००८	----------	काबूल
२०१६	हवाई तळ	----------

(२)

संस्थान	प्रमुख	भारतात विलीनीकरण वर्ष
----------	महाराजा हरिसिंग	२७ ऑक्टोबर १९४७
हैद्राबाद	----------	१७ सप्टेंबर १९४८
गोवा	पोतुगीज	----------

(पठानकोट, निझाम, २००१, जम्मू-काश्मीर, डिसेंबर १९६१, भारतीय दुतावास)

प्र. ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : **[८]**

(अ) खालील घटना तुम्हास माहीत आहे का? (कोणतेही एक) : (४)

(१) सिमला करार २ जुलै १९७२

किंवा

(२) गोवा दीव-दमण मुक्तीसंग्राम

(ब) खाली दिलेल्या समस्येवर उपाय सुचवा (कोणतेही एक) : (४)

(१) प्रादेशिकतावाद

किंवा

(२) भारत-पाकयुद्ध १९७१ (बांगलादेश मुक्तीसंग्राम)

प्र. ६. खालील विधानांवर आपले मत नोंदवा (कोणतेही दोन) : [८]

(१) भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (ISRO) कामगिरी.

(२) भारत-नेपाळ दरम्यानचे संरक्षण क्षेत्रातील संबंध.

(३) भारत-चीन युद्धात भारताच्या पराभवाची कारणे.

प्र. ७. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [१०]

(१) पूर्व आशिया विभागातील भारताचे हित संबंध स्पष्ट करा.

(२) जुनागड मुक्तीसंग्राम स्पष्ट करा.

(३) तिसऱ्या पर्वातील भारताच्या महत्त्वपूर्ण घडामोडींची माहिती लिहा.

प्र. ८. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणताही एक) : [८]

(१) भारत-पाकिस्तान संबंधात चीन हा महत्त्वपूर्ण घटक सविस्तर लिहा -

(अ) पाकिस्तान-चीन सीमा करार

(ब) मैत्रीचा महामार्ग (काराकोरम महामार्ग)

(क) ग्वादर बंदर

(ड) चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्ग

(२) सर्वंकष सुरक्षा ही संकल्पना स्पष्ट करा -

(अ) पर्यावरण सुरक्षा

(ब) आर्थिक सुरक्षा

(क) समाजाची सुरक्षा

(ड) राजकीय सुरक्षा

◆◆◆